# मिरा भाईंदर महानगरपालिका

**आयुक्त कार्यालय**

मुख्यालय, २रा मजला, स्व. इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.)

दूरध्वनी क्र.०२२-२८१९२८२८ ई-मेल आयडी commissioner@mbmc.gov.in


जा.क्र. मनपा/ आयुक्त / ५६ /२०२५-२६ दि. १७/०९/२०२५

## परिपत्रक

**विषय:-** वन क्लिक अटेंडन्स बाबत.

**संदर्भ:-** सोमवार दि.१५/९/२०२५ रोजीच्या आढावा बैठकीतील निर्देश.

महापालिकेच्या विविध विभागात कार्यरत स्थायी, अस्थायी, ठेका कर्मचारी यांच्या दैनंदिन कार्यालयीन उपस्थितीवर नियंत्रण राखण्यासाठी वन क्लिक अटेंडन्स संगणक आज्ञावली विकसित करण्यात आली आहे. यामध्ये नोंदविलेल्या उपस्थिती नुसारच वेतन अदा करण्याच्या सुचना यापुर्वीच्या आढावा बैठकीत देण्यात आलेल्या आहेत. करिता प्रत्येक कर्मचाऱ्याची वन क्लिक अटेंडन्स संगणक आज्ञावलीमध्ये नोंद असणे क्रमप्राप्त आहे.

परंतु, ठेका कर्मचाऱ्यांच्या बाबतीत काही कर्मचाऱ्यांची दैनंदिन उपस्थिती, कामकाज पध्दतीनुसार त्यांना ठेक्यातून कमी करण्यात येते व त्या बदल्यात ठेकेदाराकडून नविन कर्मचारी नेमण्यात येतात. सदर कर्मचाऱ्यांची नोंद ही त्या खात्याचे खाते प्रमुख यांनी प्रमाणित करुन सिस्टीम मॅनेजर यांचेकडे द्यावी. सिस्टीम मॅनेजर यांनी ३ दिवसात त्या ठेका कर्मचाऱ्यांची नोंद वन क्लिक अटेंडन्स संगणक आज्ञावलीमध्ये घ्यावी. यामध्ये दिरंगाई होणार नाही याची खबरदारी घ्यावी.

खाते प्रमुखांनी २ दिवसात यादी प्रमाणित करुन सिस्टीम मॅनेजर यांचेकडे नोंदीसाठी दिली नाही तर सदर कर्मचाऱ्यांची गैरहजेरी नोंदविली जाईल याची स्पष्ट नोंद घ्यावी.

**(राधाबिनोद अ. शर्मा,** भा.प्र.से.)
आयुक्त तथा प्रशासक
मिरा भाईंदर महानगरपालिका

**प्रति,**

१) खाते प्रमुख/विभाग प्रमुख (सर्व)
२) स्थळ प्रत